Vol 3 Issue 2 Nov 2013 ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

*Review Of Research*
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
**ISSN:-2249-894X**

Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# संत गाडगेबाबा यांचा दैववाद आणि धर्माबाबत दृष्टीकोन

*सुशील कुमार शिंदे*

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र)
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर

***सारांश :***

महाराष्ट्रातील धर्मनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष विचारपरंपरेने संत गाडगेबाबा यांचे स्थान अग्रभागी आहे. तथापि त्यांच्या कृतिशील विवेकी वारशाची दखल समाजाने घेतली नाही. त्यांच्या तर्कशुध्द वैचारिकतेची उपेक्षा झाली. परिणामी भारतीय समाजात देवदेवतांच्या नावाखाली धर्मांधता अंधश्रध्दा फोफावली. त्याचे अनिष्ट आणि दूरगामी परिणाम आपल्या समाजजीवनावर होऊ लागले आहेत.

***प्रस्तावना :***

महात्मा फुले यांच्यानंतर हिंदू धर्मातील दैववादाचे वाभडे करणारे संत गाडगेबाबा हे एक महापुरुष होते. त्यांनी गावोगावी केलेल्या कीर्तनातून आणि कृतीतून त्यांची धर्मनिरपेक्षता, जातिनिरपेक्षता आणि सामाजिक समता व्यक्त होत होती. त्यांच्या कृतीमध्ये तर्क होता, वैचारिक ठेवा होता. स्वतः निरक्षर असूनही तार्किक व विवेकी विचाराचे अधिठान त्यांच्या विचारकतृत्वात असल्याचे दिसून येते. गाडगेबाबांनी दैववादविरोधात एकसूत्र सैद्धांतिक मांडणी केली नाही. परंतु त्यांनी आपल्या कीर्तनांमधून आणि कृतीतून दैववादाबद्दल स्पष्ट मते व्यक्त केली आहेत.

***गाडगेबाबा यांचा दैववादाबद्दल दृष्टीकोन :***

गाडगेबाबांनी धर्मपंथ किंवा धर्मग्रंथातल्या दांभिकतेचा सातत्याने निषेध करुन ग्रामीण बहुजन समाजजीवनाचा उद्धार करणारा आचार–विचार–शिकविण्याचे कार्य केले. गाडगेबाबांनी स्वतः कोणताही धर्म मानला नाही. स्वतःला देवदेवता आणि धर्म यापासून कटाक्षाने अलिप्त ठेवण्याबाबत ते आग्रही होते. धार्मिक तटस्थेबाबत त्यांची अशी भूमिका होती की, 'आपल्या लाडक्या डेबूजीला वारा नको लागू दिऊ त्या देवदेवीचा निर्मळ ठेवा त्याला या देवदेवी नि देवकार्याच्या पापापासून. अरे अरे! कसले हे धर्म नि धर्मकुळी?'[1]

गाडगेबाबा यांना देव मान्य होता.परंतु सेवा,भक्ती आणि श्रम यांचा संयोग त्यांना दैव संकल्पनेत अभिप्रेत होता. रुढ अर्थाचा दैववाद गाडगेबाबा नाकारतात. गाडगेबाबांनी मानवपूजा किंवा मानवसेवा हा आपल्या कृतीचा केंद्रबिंदू मानला होता. म्हणून जनसेवा ही ईश्वरसेवा असे त्यांचे मत होते. त्यांच्या त्यांच्या मते 'देव तीर्थात किंवा मूर्तीत नाही, तो तुमच्यासमोर दरिद्री नारायणाचे रूपाने प्रत्यक्ष उभा आहे. त्याचीच प्रेमाने सेवा करा.' जनसेवा कार्य एकाग्रतेने करणे म्हणजे ईश्वरपूजन होय असे त्यांनी मानले.[2] मराठी विश्वकोशामध्ये 'देवदेवता किंवा दैवी 'शक्तींनी व्यक्तीच्या जन्माच्या वेळीच तिचे जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व भविष्य ठरविलेले असते, असे मानण्याची वृत्ती म्हणजे दैववाद होय', [3] असा दैववादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. जेव्हा अत्युत्कृष्ट असे मानवी प्रयत्नही निष्फळ ठरतात, आकस्मिक मृत्यू घडतो किंवा एखादी विलक्षण घटना अनपेक्षितपणे घडते, तेव्हा तर दैववादी माणसांचा दैववादावरचा विश्वास अधिकच दृढ होतो. विशेषतः व्यक्तीचा जन्म, विवाह, आरोग्य, मृत्यू इ. बाबतीत घडणाऱ्या घटना दैवामुळे घडतात, असे मानले जाते.[4]परंतु गाडगेबाबांनी आपल्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात दैववाद विरोधी भूमिका घेतलेली दिसते. स्वतःच्या मुलाच्या निधनाची वार्ता कानावर आली तेव्हा त्याचा दोष कर्माला न देता ती एक नैसर्गिक घटना समजून गाडगेबाबा त्याच संध्याकाळी गावात फिरुन भाकरी मागून आणतात आणि आपल्या कीर्तनाला ठरल्याप्रमाणे सुरुवात करतात – 'ऐसे गेले कोटयानुकोटी ! काय रडू एकासाठी !!' [5]

घडण्याआधीच कळलेले भविष्य प्रतिकूल वाटत असेल, तर ते अनुकूल करुन घेण्याची इच्छा बाळगणे, ही दैववादी लोकांची एक प्रवृत्ती असते. त्यासाठी मंत्रतंत्र, जादूटोणा, दानादी धार्मिक कृत्ये, ताईत, नवस इत्यादींद्वारे भविष्य अनुकूल करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. [6]"दैववादाच्या पाढपुराव्यासाठी निपजलेल्या दैववादाने हिंदू लोकांची आतोनात अवनती केलेली आहे. देश–देव–धर्माच्या या सगळया विलक्षण आणि माणूसघाण्या परिस्थितीच्या पार्श्वभागावर उभे राहून गाडगेबाबांच्या सेवा–धर्माची प्राणप्रतिष्ठा झालेली आहे. अडाणी जनतेला अध्यात्माच्या, बुवाबाजीच्या खुळापासून मुक्त करुन, व्यवहाराच्या चोख कर्तव्य कर्माच्या राजमार्गावर आणून उभे केले पाहिजे; या एकाच ध्येयाने डेबूजीने आपल्या कीर्तन प्रवचनांच्या धोरणाची दिशा स्पष्ट आखून घेतली होती".[7] – असे प्रबोधकार यांनी म्हटले आहेच.

दैवाच्या अपरिवर्तनीय स्वरुपावर दृढ विश्वास असतो ती माणसे दैवामुळेच आग, पूर, साथीचे रोग, दुष्काळ अथवा वैयक्तिक जीवनातील दारिद्रयाची संकटे येतात, असे मानतात आणि त्यांचा प्रतिकार न करता निष्क्रिय राहतात.[8] गाडगेबाबा मात्र या निष्क्रियवादी दैववादाला छेद देतात. 'जे लेकरु बरं व्हावं, म्हणून देवापुढं बकरु कापलं, थे पुन्हा आजारी पडते. जे आजारी पडलं, त्याने डॉक्टराकडे न्यावाव, का अंगारे धुपारे कराव? त्याच्या तब्येतीचं डॉक्टरले कळते, का देवरुषाला कळते?[9] 'असा विज्ञानवादी उपदेश गाडगेबाबा करतात. कर्ज काढून देवाची यात्रा करणे, नवस करुन पशुहत्या करण्यास त्याचा विरोध होता. तथापि त्यांनी देवाचे भजन केल्याशिवाय राहू नका असेही सांगितले आहे.10 कारण त्याला खर्च करावा लागत नाही. गाडगेबाबांना भजनाची आवड होती आणि ईश्वरावर त्यांचा विश्वास होता. तथापि त्यांची भक्ती आंधळी नव्हती. डोळस होती. त्यांची ईश्वर सेवेबाबत अशी धारणा होती की, 'शिलकी आयुष्य गरजवंत लोकांच्या सेवेत झिजवले, तर तीच खरी देवाची सेवा. देवळातल्या दगडी देवाचे हातपाय रगडून काय होणार?सभोवार पसरलेली ही माणसांची दुनिया, हे खरे ईश्वराचे रुप आहे. त्या

हजारो लाखो देवांची पडेल त्या रीतीने केलेली सेवा देवाघरी रुजू होते.[11]

दैववादातील नवस, जादूटोणा, चमत्कार अशा कर्मकांडाला गाडगेबाबा प्रखरपणे विरोध करतात. या कर्मकांडास पोथी पुराणांना आणि त्यातील पोथिनिष्ठतेला जबाबदार धरताना गाडगेबाबा म्हणतात, 'सगळया पोथ्या पुराणांत हे असले चमत्कार रगड लिहिले आहेत. पण खरं, खोट आपण उमजून घेतले पाहिजे. उगाच मेंढयामागे मेंढयाप्रमाणे जाण्यात काय हाशील?[12] गाडगेबाबांनी ईश्वर मानला परंतु दैववादातील कर्मकांड नाकारले. त्यामुळे त्यांनी कोठेही एखादे देऊळ बांधले नाही किंवा स्वतःसाठी मठ उभारलेला नाही. पंढरपूर वा अन्य तीर्थाच्या ठिकाणी दगडी देवांचे दर्शनही त्यांनी कधी घेतले नाही. देव देवळात आहे ही कल्पनाच ते अमान्य करतात आणि इतरांनीही ती मानू नये असा त्यांचा आग्रह होता. तथापि त्यांना देवळांबद्दल अनादर होता असे नव्हे. ईश्वर भक्तीतील पाखंडीपणाला त्यांनी विरोध केला. निरपेक्ष सेवाभावी भक्तीचे ते आग्रही प्रतिपादन करतात. देवापुढे पैसा, फळे ठेवणे हे भक्तीचे स्तोम गाडगेबाबांना मान्य नव्हते. त्यांच्या मते, देव भाव–भक्तीशिवाय कशाचाच भुकेला नाही. भक्ती–भावाने केलेल्या एका नमस्कारातच देव खूश असतो.[13]

गाडगेबाबांच्या मते, देव म्हणजे काय, सांगणे कठीण आहे. तथापि हे संपूर्ण जग निर्माण करणारी आणि ते यंत्रासारखे सुरळीत ठेवणारी आणि अखेर ते लयालाही नेणारी एखादी महाशक्ती असावी. तिला आपल्या कुवतीप्रमाणे प्रत्येक धर्माने काहीतरी नाव द्या. परंतु तो भक्तांना स्वप्नात दर्शन देतो, त्यांना साक्षात्कार होतो, या गोष्टी थोतांड आहेत[14] हा गाडगेबाबांचा सिद्धांत होता. अध्यात्माच्या जंजाळात न शिरताही, संसारात राहून ईश्वरभक्ती करता येते अशी साधी व सरळ शिकवण ते समाजाला देतात.[15] यातून गाडगेबाबांच्या वैचारिक प्रगल्भतेचे आणि त्यांच्या विवेकी, दैववादविरोधी विचारांचे दर्शन घडते.

### *गाडगेबाबा यांचा धर्माविषयी दृष्टीकोन :*

धार्मिक बाबतीत संत तुकाराम व संत कबीर यांच्या लिखाणाचा व एकूण व्यक्तिमत्वाचा प्रभाव गाडगेबाबांवर होता. त्यांची अनेक वचने ते आपल्या कीर्तनातून उद्धृत करीत. तुकारामांमधला फटकळपणा त्यांच्या विचारात व वागणूकीत पुरेपुर होता व संत कबीरांमधला सर्वधर्म समभाव तरीही गाडगेबाबा भक्तिपंथी धार्मिक संत नव्हते. त्यांनी कीर्तन हे परमेश्वरप्राप्तीचे माध्यम म्हणून वापरले. त्यांनी विश्वनिर्मात्या ईश्वराचे अस्तित्व मान्य केले असल्यामुळे ते निधर्मी, निरीश्वरवादी होते असे म्हणता येत नाही.[16] गाडगेबाबांच्या धर्मविषयक दृष्टीकोनाबाबत प्रामुख्याने सहा वैशिष्टये सांगता येतील.

1.त्यांना मानवतावादी स्वरुपाचा धर्म अभिप्रेत होता. धर्म म्हणजे मानवतावाद अशी त्यांची निश्चित धारणा होती. मानवतेचे शुद्ध आचरण, अहिंसा, निव्यर्सनीपणा, अंधश्रद्धेचा त्याग म्हणजे धर्म होय अशी त्यांची धर्माची कल्पना होती. अंधश्रद्धाळू, हिंसक, व्यसनी, अमानवी–अघोरी कृत्य करण्यास प्रवृत्त करणारा अमानवी धर्म त्यांनी नाकारला आहे.[17]

2.धर्माबाबत तथाकथित साधुसंतांनी सांगितलेली मोक्षप्राप्ती गाडगेबाबांनी नाकारली. त्यांनी जो त्याग, संसार केला त्याला व्यापक समाजहिताचे अधिष्ठान होते, मोक्षप्राप्तीचा त्याला आधार नव्हता. मामुली साधू, संत मोक्षासाठी संसार त्यागाची भक्तगणांना शिकवण देतात. गाडगेबाबांना हे मोक्ष मुक्तीचे आणि हरिनामाचे–स्मरणाने भवसागर तरुन जाण्याचे आध्यात्मिक खूळ कधीच पटले नाही.18 अशा शब्दात प्रबोधनकार ठाकरे गाडगेबाबांचा धर्मविषयक दृष्टीकोन स्पष्ट करतात.

3.गाडगेबाबांच्या धर्मसंकल्पनेला पर्यावरणवादाचे अधिष्ठान आहे. मानवाप्रमाणे पशुपक्षांना त्यांचे अस्तित्व टिकविण्याचा, जीवन जगण्याचा हक्क गाडगेबाबा मान्य करतात. धर्माबाबतचा हा त्यांचा मूलभूत दृष्टीकोन मानवा लागेल. माणसाच्या बाबतीत प्रेम आणि पशूंच्या बाबतीत कौर्य ही विसंगती गाडगेबाबांना अनीती वाटते. प्राणीमात्रांकडे समबुद्धीने पाहण्याचा दृष्टीकोन गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून व्यक्त करतात. याच भूमिकेतून त्यांनी नरबळीच्या क्रूर प्रथेला प्रतिकार केला.[19]

4.गाडगेबाबांनी स्वतः कोणताही धार्मिक संप्रदाय किंवा गुरुपरंपरा सुरु केली नाही. त्यांनी संत तुकारामांना गुरु मानले असले तरी शिष्य कोणाला केले नाही.20 त्यांनी आपले कोठेही मठ स्थापन केले नाहीत वा कोणाला पाया पडू दिले नाही.

5.गाडगेबाबांनी पोथीनिष्ठ धर्मवादाला प्रखरपणे विरोध केला, प्रतिवाद केला. ते सश्रद्ध असूनही बुद्धिवादी होते. कर्मकांडात्मक धर्माला त्यांनी प्रखर विरोध केला. असे कर्मकांड म्हणजे जनतेची आर्थिक आणि धार्मिक लूट करण्याची प्रक्रिया आहे असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी धार्मिक विधीतील फोलपणा पटवून देण्यावर विशेष भर दिला.

6.गाडगेबाबा निरीश्वरवादी नव्हते. त्यांना चराचरात परमेश्वर दिसत होता. या भूमीकेतूनच त्यांनी मूर्तिपूजेचे स्तोम नाकारले. अठ्ठाविस युगे विटेवर उभ्या असणाऱ्या विठोबाच्या देवळात साधा प्रवेश करण्याचाही मोह त्यांना कधी झाला नाही.21 जनता जनार्दनाची सेवा म्हणजे भक्ती होय, देव व धर्म होय ही धर्माबाबत साधी व सोपी मांडणी गाडगेबाबा मांडतात.

### *निष्कर्ष :*

1.गाडगेबाबांना देव मान्य होता. परंतु त्यांनी रुढ अर्थाचा दैववाद नाकारला.

2.गाडगेबाबांच्या मते दैववाद मानवाला निष्क्रिय बनवितो. त्यामुळे मानवाचे धार्मिक व आर्थिक शोषण होते. त्यांनी निष्क्रियवादी दैववादाला छेद दिला.

3.दैववाद व कर्मकांडाला पोथी पुराण जबाबदार आहेत, असे गाडगेबाबांचे मत आहे.

4.गाडगेबाबांना ईश्वर मान्य होता. मात्र ईश्वर भक्तीतील पाखंडीपणाला त्यांनी विरोध केला. निरपेक्ष सेवाभावी भक्तीचे ते आग्रही प्रतिपादक होते.

5.गाडगेबाबांना मानवतावादी धर्म अभिप्रेत होता. या भूमिकेतून त्यांनी पशुहत्या व अमानवी कर्मकांडास विरोध केला.

6.गाडगेबाबांना धर्म व भक्तीतून मोक्षप्राप्ती मान्य नव्हती.

7.गाडगेबाबांच्या धर्मसंकल्पनेला पर्यावरणवादाचे अधिष्ठान आहे.

8.गाडगेबाबा ना धार्मिक संप्रदायाचे, पंथाचे अनुयायी होते ना त्यांनी कोणताही धर्मसंप्रदाय निर्माण केला.

9.गाडगेबाबांनी मूर्तीपूजेचे स्तोम नाकारले. त्यांनी कधी दर्शनासाठी देवळात प्रवेशही केला नाही अथवा मूर्तीचे दर्शनही घेतले नाही.

10.गाडगेबाबांना धर्मामध्ये सेवा, त्याग, अहिंसा, निरपेक्ष भक्ती अभिप्रेत होती.

### *संदर्भ ग्रंथसूची –*

1.ठाकरे (प्रबोधनकार), के.सी., श्री संत गाडगे बाबा, नाग–नालंदा प्रकाशन, इस्लापूर, संपादकीय आवृत्ती, 2009, पृ.13.

2.भगत (प्राचार्य), रा. तु.,(संपा.), संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 2004, पृ.91–92.

3.जोशी (तर्कतीर्थ), लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड–7, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1977, पृ.941.

4.कित्ता.

5.दांडेकर, गो.नी., श्रीगाडगेमहाराज, मॅजिस्टिक पब्लिशिंग हाऊस, पृ.125.

6.मराठी विश्वकोश, खंड–7, पृ.942.

7.ठाकरे (प्रबोधनकार), के.सी., श्री संत गाडगे बाबा, पृ.67–69
8.मराठी विश्वकोश, खंड–7, पृ.942.
9.दांडेकर, गो.नी., श्रीगाडगेमहाराज, पृ.78.
10.कित्ता. पृ.70
11.ठाकरे (प्रबोधनकार), के.सी., श्री संत गाडगे बाबा, पृ.45.
12.कित्ता. पृ.78
13.कित्ता. पृ.76
14.कित्ता. पृ.72–73
15.जोशी (तर्कतीर्थ), लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड–4, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 19767, पृ.955.
16.भगत, रा.तु. (संपा.), श्री गाडगेमहाराज गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, 1992, पृ.90–91.
17.ठाकरे (प्रबोधनकार), के.सी., श्री संत गाडगे बाबा, पृ.37.
18.कित्ता.
19.भगत, रा.तु. (संपा.), श्री गाडगेमहाराज गौरव ग्रंथ, पृ..91.
20.कित्ता.
21.कित्ता. पृ.46

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net